# विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे विभाग,पुणे

१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.

दुरध्वनी क्र.-०२०-२६१२२२१७, ई मेल आय डीक्र.dydpune @ gmail.com, वेब साईट- www.dydepune .com


जाक्र./शिउसं/उमाशि-४०३/सहविचारसभा(ऑक्टो१८)/१८/ 6063

दिनांक- 29 SEP 2018

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद अहमदनगर/पुणे/सोलापूर
अधीक्षक (माध्यमिक),
वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक,
अहमदनगर/पुणे/सोलापूर
लेखाधिकारी, लेखा तपासणी पथक,
अहमदनगर/पुणे/सोलापूर

**विषयः शै.वर्ष २०१८-१९ च्या पहिल्या सत्रातील सहविचार सभा आयोजित करणेबाबत**

संदर्भः- अध्यक्ष, विभागीय पुणे कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटना यांचे पत्र
जा.क्र.१०/समक्ष/२०१८-१९ दि. १९.०९.२०१८

उपरोक्त विषयानुसार पुणे विभागीय शिक्षक संघटना पुणे यांच्या दि. १९.०९.२०१८ च्या संदर्भिय पत्रानुसार कळविण्यात येते की, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनेबरोबर शैक्षणिक वर्ष २०१८-१९ च्या पहिल्या सत्रातील सहविचार सभा दिनांक ११.१०.२०१८ रोजी घेण्यात येणार आहे, सदरची सभा **दयानंद महाविद्यालय, सोलापूर** येथे दुपारी १२.३० वाजता घेण्यात येणार आहे. सोबत जोडलेल्या विषयानुसार आपल्या कार्यालयाची माहिती अद्यायवत घेवुन बैठकीस व्यक्तिशः उपस्थित राहवे प्रतिनिधी पाठवू नये.

मागील सहविचार सभेसाठी शिक्षणाधिकारी (माध्य) जि.प.अहमदनगर/पुणे/सोलापूर व अधिक्षक (माध्य) जि.प.अहमदनगर/पुणे/सोलापूर हे स्वतः न उपस्थित राहता प्रतिनिधी पाठविले होते, याबाबत संघटना प्रतिनिधी पदाधिकारी यांनी नाराजी दर्शविली होती व पुढील सहविचार सभेस विभागतील सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) व अधिक्षक (माध्य) वेतन व भनिनि पथक हे उपस्थित रहावेत अशी मागणी त्यांनी केली असल्यामुळे सदर सहविचार सभेस स्वतः उपस्थित रहावे, प्रतिनिधी पाठवु नये.

**सोबत :- विषय पत्रिका**

(मिनाक्षी राऊत)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१

**प्रत : माहितीस्तव सविनय सादर**
**१) मा. आयुक्त (शिक्षण) म.रा. पुणे-१**
**प्रत : माहितीस्तव** अध्यक्ष, विभागीय पुणे कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटना

Scanned by CamScanner

# दि. ११.१०.२०१८ रोजीच्या सहविचार सभेचे विषय सुची

| अ.क्र. | विषय | तपशिल |
|---|---|---|
| १ | मागील दि. १७.०२.२०१८ रोजी झालेल्या निर्णयाच्या कार्यवाहीचा आढावा घेणे | सदर सभेचे इतिवृत्त सर्वांना ई-मेल केलेला आहे. दि.२१.०९.२०१८ रोजी वेळ ११.५९ ला ई-मेल केलेला आहे. |
| २ | दि.०२ मे २०१२ नंतर नियुक्ती झालेल्या कनिष्ठ महाविद्यालय शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यतेच्या कार्यवाहीचा आढावा घेणे. | शिक्षण उपसंचालक कार्यालयाच्या स्तरावरील |
| ३ | प्रलंबित असलेल्या संचमान्यता , सीएचबी व अर्धवेळ शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता व पुर्णवेळ शिक्षकांच्या बदली मान्यता, रजा मुदतीतील शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यतेबाबतच्या आढावा घेणे. | शिक्षण उपसंचालक कार्यालयाच्या स्तरावरील |
| ४ | शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील संच मान्यता व शिक्षक मान्यता शिबीर कार्यपध्दतीची माहिती घेऊन निर्णय घेणे. | शिक्षण उपसंचालक कार्यालयाच्या स्तरावरील |
| ५ | मुल्यांकनपात्र व अपात्र युनिट/तुकडयांची माहिती घेणे. | शिक्षण उपसंचालक कार्यालयाच्या स्तरावरील व शिक्षणाधिकारी(माध्य) जि.प.अहमदनगर/पुणे/सोलापूर |
| ६ | प्रलंबित निवडश्रेणी प्रस्तावांच्या कार्यवाहीचा आढावा घेणे. | शिक्षण उपसंचालक कार्यालयाच्या स्तरावरील |
| ७ | जिल्हानिहाय व विषयनिहाय अतिरिक्त कनिष्ठ महाविद्यालयानी शिक्षकांची माहिती घेणे. | शिक्षण उपसंचालक कार्यालयाच्या स्तरावरील |
| ८ | शालार्थसाठी दाखल प्रस्तावाचा आढावा घेणे. | शिक्षण उपसंचालक कार्यालयाच्या स्तरावरील व शिक्षणाधिकारी(माध्य) जि.प.अहमदनगर/पुणे/सोलापूर |
| ९ | जिल्हानिहाय व विषयनिहाय शिक्षणाधिकारी (माध्य) , वेतन व भनिनि पथक कार्यालयाकडील प्रश्नांच्या (प्रा.फंड स्लिपा, रजा मुदतीत नियुक्त शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता कार्यपध्दती, प्रलंबित मेडिकल बीले, सीएचबी, अर्धवेळ प्रलंबित पगारबिले, प्रा.फंड ट्रान्सफर इ.) कार्यपध्दतीबाबतची माहिती घेणे. | शिक्षणाधिकारी(माध्य) जि.प.अहमदनगर/पुणे/सोलापूर स्तरावरील |
| १० | जिल्हानिहाय लेखाधिकारी कार्यालयातील वेतनश्रेणी निश्चिती पडताळणीबाबतची माहिती घेणे. | लेखाधिकारी, लेखातपासणी पथक, अहमदनगर/पुणे/सोलापूर स्तरावरील |
| १० | ऐनवेळच्या विषयावर मा. सभाध्यक्षांच्या परवानगीने विचार विनिमय करणे. | |

Scanned by CamScanner